# नियमीत दिवाणी मुकदमा क्र.९५/२०१५ मधील
# निशाणी क्र.४३ वर आदेश

**CNRNO.MHLA110007642018.**

---

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ने विनाकैफियतीचा आदेश बाजूस सारुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादीच्या भावाने कागदपत्र हरविल्यामुळे सदर प्रतिवादीला मुदतीमध्ये प्रकरणामध्ये हजर होऊन कैफियत दाखल करता आलेली नाही. त्यामुळे सदर प्रतिवादीविरुध्द झालेला विनाकैफियतीचा आदेश बाजूस सारुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्याची सदर प्रतिवादीने विनंती केली आहे.

२. सदर अर्जास वादीने म्हणणे दाखल करून विरोध दर्शविलेला आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, अर्जात नमूद केलेले कारण योग्य व कायदेशीर नाही. प्रतिवादी क्र.१ ने जाणुनबुजून कैफियत दाखल करण्यासाठी विलंब केलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावे असे वादीने मागणी केलेली आहे.

३. सदर प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकनावरुन स्पष्ट होते की, सदर प्रतिवादी क्र.१ ला दि.०८/०५/२०१५ रोजी दाव्याच्या समन्सची बजावणी झालेली आहे. सदर प्रतिवादीने मुदतीमध्ये कैफियत दाखल केलेली नाही. सदर अर्जाच्या कथनाच्या पृष्ठर्थ सदर प्रतिवादीने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. सदरचा दावा मिळकतीच्या वाटपाकरिता दाखल आहे. तसेच सदर प्रकरणातील ईतर प्रतिवादी अद्याप हजर झालेले नाहीत. त्यामुळे केवळ नैसर्गीक न्यायाचे तत्व विचारात घेवून माझे असे मत झाले आहे की, पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्यासाठी पक्षकारांमधील वाद गुणदोषावर निकाली काढणे आवश्यक आहे. त्याकरीता प्रतिवादीला बचाव मांडण्यासाठी संधी देणे न्यायोचीत होणार

आहे. त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब व पक्षकारामधील वादाचे स्वरुप विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ वर खर्च बसवून मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. नि.क्र.४३ वरील अर्ज प्रतिवादी क्र.१ वर रक्कम रु.२०००/- खर्च बसवून मंजूर करण्यात येत आहे.

२. वर नमूद खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.१ ने वादीला पुढील तारखेपर्यंत द्यावे अथवा न्यायालयात जमा करावे.

स्वा/-

दि. ०५.०८.२०१९. (शि. म. गौरगोंड)

सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
निलंगा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

Name of the Stenographer : M.N. Yenge
Name of the Court : Jt. C.J.S.D Court
(Shivkant M. Gourgond)
Date of Judgment/Order : 05.08.2019
Judgment/Order signed by presiding officer : 05.08.2019
Judgment/Order uploaded on : 06.08.2019